रजिस्टर्ड नं. एनजीपी-४

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

नं. २७] गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर १९९१/कार्तिक ९, शके १९१३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ — अमरावती विभागीय पुरवणी

(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा. अ. क्र. ११९

### BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. D. P.-Karanja (R)- TPV-IV-7231A.—

Whereas, Karanja Municipal Council (hereinafter referred to as the 'said Municipal Council') by its Administrative Resolution No. 10, dated 11th January 1982, made a declaration under section 38 read with section 23 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966), (hereinafter referred to as the 'said Act') of its intention to prepare a Revised Development Plan of the entire area within its jurisdiction, which appeared in the Maharashtra Government Gazette, Part I-A, Amravati Division Supplement, dated 25th February 1982 on pages 53 and 54 ;

And whereas, the said Municipal Council after carrying out survey of the entire area within its jurisdiction prepared and published Draft Development Plan of Karanja (R) (hereinafter referred to as the 'said Development Plan') on 17th August 1984 and published a notice to that effect in Maharashtra Government Gazette Part I-A, Amravati Division Supplement, dated 23rd August 1984 on pages 211 and 212 in accordance with the provisions of sub-section (1) of section 26 of the said Act ;

And whereas, the said Municipal Council, after considering the suggestions and objections received by it from the members of the public, modified the said Development Plan in accordance with the provisions of section 28 of the said Act and submitted the said Development Plan as modified by it to the Government of Maharashtra for sanction under sub-section (1) of section 30 of the said Act on 30th April 1985;

And whereas, Government of Maharashtra has delegated the powers pertaining to section 31 of the said Act in respect of 'B' and 'C' Class Municipal Councils to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide Government Resolution No. TPV-1086-3791/CR-I/UD-17, dated 5th January 1987 ;

And whereas, the Karanja Municipal Council is a 'B' Class Municipal Council ;

And whereas, as per the powers conferred under sub-section (1) of section 31 of the said Act, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has extended the period for sanctioning the said Development Plan upto and inclusive of 31st October 1988 vide Notification No. DP-Karanja (R)-TPV-IV-7231-A, dated 29th October 1988 ;

And whereas, Director of Town Planning, Maharashtra State, Pune proposes to sanction the said Development Plan subject to certain Modifications which are of minor nature as specified in the schedule of modifications appended hereto the notification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 31 of the said Act and all other powers enabling it in this behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby —

(a) sanctions the said Development Plan subject to modifications of minor nature as specified in the 'Schedule of Modifications' appended to this notification and ;

(b) fixes the 31st January 1989 to be the date on which the final Development Plan of Karanja (R) shall came into force.

## SCHEDULE OF MODIFICATIONS

1. The nomenclature of Site No. 10 'Mini Stadium' shall be changed as "Play ground" as shown in orange on the Development Plan.

2. The nomenolature of Site No. 11 'Childrens Garden' shall be changed as "Garden" as shown in orange on the Development Plan.

3. The Site No. 13 'Vegetable Market and Mutton Market' shall be deleted and the area so released therefrom shall be amalgamated in the Site No. 14 'Primary School'. Further the nomenclature of the entire Site No. 14 shall be changed as site for 'Primary School and Play ground' and it shall admeasure about 0.54 ha. in area. This modification is shown in orange on the Development Plan.

4. The location of Site No. 16 'S.T. Bus Stand' shall be modified as showh in orange on the Development Plan. The new Site No. 16 shall now admeasure about 1.20 ha. in area.

5. The width of 12 m. wide East-West road passing along the Southern boundary of Site No. 16 'S.T. Bus Stand' was subsequently proposed to be widened to 15 m. as also the new road links of 15 m. width were introduced along the either sides of this 15 m. wide road passing along the Southern boundary of Site Nos. 13 and 36 respectively while submitting the Development Plan for according final sanction thereto as shown in blue lines on the Development Plan. The East-West section of this 15 m. wide road connecting Site Nos. 13 and 16 shall be now further widened to 24 m. with slight change in its alignment as shown in orange on the Development Plan.

6. Consequential to above modification in the 15 m. vide East-West road, the further Southward link of 15 m. wide North-South road passing along the Eastern boundary of Sarang Tank shall also be widened to 24 m. with slight change in its alignment as shown in orange on the Development Plan.

7. The alignment of 15 m. wide Development Plan road passing through the common boundaries off Site Nos. 17 to 19 and further passing along the Eastern boundary of Site No. 16 of the Draft Development Plan shall be now modified as shown in orange on the Development Plan.

8. The Site No. 17 'Shopping Center' shall be relocated at the junction of two Development Plan roads viz. 12 m. wide North-South road and 24 m. wide East-West road (just along the South side of the 24 m. wide road) as shown in orange on the Development Plan.

9. Consequential to modification at Sr. Nos. 7 and 8 above the area released from the Site No. 17 of the Draft Development Plan as also the trangular portion now formed due to shifting of 15 m. wide road towards West of the Site No. 17 shall be now included in the "Public-Semi-Public Zone" as shown in orange on the Development Plan.

10. The two Sites viz. Site No. 19 'Dispensary' and Site No. 20 'Maternity Home' shall be now combined together to form as one site and shall be renamed as site for "Dispensary and Maternity Home" as shown in orange on the Development Plan. This combine site shall now admeasure about 0.48 ha. in area.

11. The nomenclature of the Site No. 27 'Dispensary' shall be now changed as site for 'Dispensary and Maternity Home' both combine together as shown in orange on the Development Plan.

12. Consequential to above change the Site No. 28 'Maternity Home' shall be deleted from the reservation and the area so released therefrom shall be included in 'Residential Zone' as shown in orange on the Development Plan.

13. The site No. 29 'Shopping Center' shall be deleted and the area so released therefrom shall be included in 'Residential Zone' as shown in orange on the Development Plan.

14. The Site No. 37 'Shopping Center' shall be deleted and relocated in the 'South-West' corner of the Site No. 36 'Civic Center' as shown in orange on the Development Plan. Further the nomenclature of this site shall be made as 'Shopping Center and Vegetable Market' as against only 'Shopping Center'. Consequential to this modification the Site No. 36 shall now admeasure about 3.03 ha.

15. Further consequential to above modification the land so released from the Site No. 37 'Vegetable Market' shall be amalgamated in the Site No. 38 'Primary School' as also the designation of Site No. 38 shall now be changed as 'Primary School and Play ground' as against 'Primary School' as shown in orange on the Development Plan. This site shall now admeasure about 0.60 ha. in area.

16. The nomenclature of Site No. 39 shall be changed as 'Garden' instead of 'Open Space' as shown in orange on the Development Plan.

17. The Site No. 40 'Shopping Centre' of the Draft Development Plan shall be modified so as to exclude therefrom the Eastern part thereof already being under the use of 'Veterinary Dispensary' and 'Electric House', as shown in orange on the Development Plan. The modified Site No. 40 shall now admeasure about 0.60 ha. in area.

18. The lands bearing (a) Site No. 42 'Fire Brigade', (b) Site No. 43 'Town Hall', (c) The Eastern half portion of Site No. 44 'Weekly Market and Shopping Center' (inclusive of existing office building of Agricultural Produce Market Committee Yard), and (d) part of land out of Site No. 45 'Slaughter House and Mutton Market' shall be deleted from the corresponding reservation and the lands so released therefrom in one piece shall be earmarked as 'Existing site of Agricultural Produce Market Committee Yard, Karanja' as shown in orange on the Development Plan.

Consequential to above modification the Site No. 44 'Weekly Market and Shopping Centre' shall now admeasure about 1.15 ha. in area.

19. The remaining Site No. 45 'Slaughter House and Mutton Market' shall be deleted and the land so released therefrom shall be included in 'Residential Zone' as shown in orange on the Development Plan.

20. The major portion of Site No. 51 'Open Space' abutting the Eastern boundary of existing Garden shall be deleted and the land so released therefrom shall be included in 'Residential Zont' as shown in orange on the Development Plan.

21. The nomenclature of Southrn wing of Site No. 51 'Open Space' abutting the Southern boundary of existing 'Garden' shall be changed as "Extension to Garden" as shown in orange on the Development Plan.

22. The nomenclature of the Site No. 52 'Open Space and Gymnasium' shall be changed as 'Play ground and Gymnasium' as shown in orange on the Development Plan.

23. The Site No. 54 'Maternity Home' shall be deleted and the area so released therefrom shall be amalgamated in adjacent Site No. 53 'Primary School' as shown in orange on the Development Plan. The nomenclature of Site No. 53 'Primary School' shall now be changed as Site for 'Primary School and Play ground' and it shall admeasure about 0.54 ha. in area.

24. In Appendix 'G' of the Standardised Building Byelaws and Development Control Rules made applicable to the Karanja Town under the Caption 'G-2 Residential Zone R-2', the minimum width of road allowing R-2 users in gaothan area shall be corrected as 7.5 m. instead of 9 m.

*NOTE.*—The aforesaid Final Development Plan as sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune be kept open for a period of one year in the office of the Karanja Municipal Council for inspection by the public during office hours on all working days.

P. T. HARDIKAR,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune:
The 29th Oct. 1988.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२०.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक वियो–कारंजा–(सु)-टीपीव्ही-४/७२३१-अ.—

ज्याअर्थी, कारंजा नगर परिषदेने (यापुढे "उक्त नगर परिषद" म्हणून उल्लेखिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र १९६६ चा ३७ वा) (येथून पुढे "उक्त अधिनियम" म्हणून निर्दिष्ट) चे कलम ३८ व २३ चे उपकलम (१) खाली त्यांच्या हद्दीतील क्षेत्रासाठी सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा त्यांच्या ठराव क्र. १०, दिनांक ११ जानेवारी १९८२ अन्वये जाहीर केलेला आहे. आणि संबंधित इरादा दिनांक २५ फेब्रुवारी १९८२ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र, पुरवणी भाग–१-अ, अमरावती विभागाच्या पृष्ठ क्र. ५३ व ५४ वर प्रकाशित झालेला आहे;

आणि ज्याअर्थी "उक्त नगर परिषदेने" आपल्या हद्दीतील क्षेत्रासाठी आवश्यक त्या सर्वेक्षणानंतर दिनांक १७ ऑगस्ट १९८४ रोजी उक्त प्रारुप विकास योजना प्रकाशित केली आणि तशी नोटीस उक्त अधिनियमाच्या कलम २६ च्या उपबंधानुसार दिनांक २३ ऑगस्ट १९८४ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र, पुरवणी भाग १-अ, अमरावती विभागाच्या पृष्ठ क्र. २११ व २१२ वर प्रकाशित केली;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २८ च्या उपबंधानुसार विकास योजनेतील प्रस्तावावर लोकांच्याकडून आलेल्या सुचना व हरकती विचारात घेऊन उक्त नगर परिषदेने उक्त विकास योजना महाराष्ट्र शासनाकडे उक्त अधिनियमाच्या कलम ३० (१) अन्वये दिनांक ३० एप्रिल १९८५ रोजी मंजुरीसाठी सादर केली;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या निर्णय क्र टीपीव्ही–१०८६/३७९१/सीआर–१/८७/युडी–१७, दिनांक ५ जानेवारी १९८७ अन्वये "ब" व "क" वर्ग नगर परिषदांच्या बाबतीत मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त नगर परिषद ही "ब" वर्ग नगर परिषद आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) नुसार प्रदत्त असलेल्या शक्तीचा वापर करून मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त विकास योजनेस अंतिम मंजुरी देण्याची मुदत त्यांचे आदेश क्र. वियो-कारंजा (सु)/टीपीव्ही–४/७२३१-अ, दिनांक २९ ऑक्टोबर १९८८ अन्वये ३१ ऑक्टोबर १९८८ पर्यंत तो दिवस धरून वाढविली आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त विकास योजनेस खाली दर्शविलेल्या किरकोळ फेरबदलांसह मंजुरी देण्याचे ठरविले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार व दिनांक ५ जानेवारी १९८७ च्या शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा. संचालक, नगर रचना—

(अ) उक्त विकास योजनेत किरकोळ स्वरूपाच्या फेरबदलांसह (अनुसूचीत नमूद केल्याप्रमाणे) मंजुरी देत आहेत.

(ब) मंजुरी दिल्याप्रमाणे विकास योजना अंमलात येण्याची तारीख ३१ जानेवारी १९८९ निश्चित करीत आहेत.

---

**फेरबदलाची अनुसूची**

१. आ. क्र. १०–"मिनी स्टेडियम" या आरक्षणाचे नाव आता "खेळाचे मैदान" असे बदलण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगाने दर्शविला आहे.

२. आ. क्र. ११– "मुलांचा बगीचा" या आरक्षणाचे नांव आता "बगीचा" असे बदलण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगाने दर्शविला आहे.

३. आ. क्र. १३–"भाजी मार्केट व मटन मार्केट" हे आरक्षण रद्द करण्यात येऊन त्या खालील आरक्षण मुक्त क्षेत्र आ. क्र. १४–"प्राथमिक शाळा" मध्ये सामील करण्यात येत आहे तसेच आ. क्र. १४ चे नाव आता "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" असे बदलण्यात येत असून त्याचे क्षेत्र अंदाजे ०.५४ हे. इतके होईल. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगाने दर्शविला आहे.

४. आ. क्र. १६– "एस. टी. बस स्थानक" या आरक्षणाच्या स्थानात विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगाने दर्शविल्यानुसार दुरुस्ती करण्यात येत आहे. दुरुस्त आ. क्र. १६ चे क्षत्र आता अंदाजे १.२० हे. इतके भरेल.

५. आ. क्र. १६–"एस. टी. बस स्थानक" आरक्षणाच्या दक्षिण हद्दीवरून जाणाऱ्या १२ मी. रुंदीच्या रस्त्याची रुंदी प्रारूप विकास योजना मंजुरीसाठी सादर करताना १५ मी. इतकी करण्यात आली होती. तसेच या रस्त्याचे दोन्ही बाजुकडे अनुक्रमे आ. क्र. १३ व आ. क्र. ३६ च्या दक्षिण हद्दीने १५ मी. रूंदीचे रस्ते नव्याने नियोजण्यात आले होते. (विकास योजना नकाशावर निळ्या रंगाने दर्शविल्यानुसार) या १५ मी. रस्त्याच्या पूर्वेकडील हिश्याच्या (आ. क्र. १३ व १६ जोडणारा भाग) आखणोत थोड्याशा बदलासह सदर रस्त्याची रुंदी आता २४ मी. इतकी वाढविण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

६. वरील बदलाच्याच अनुषंगाने सारंग तलावाच्या पूर्व हद्दीने जाणाऱ्या दक्षिणोत्तर १५ मी. रुंदीच्या रस्त्याच्या आखणीत थोड्याशा बदलासह सदर रस्त्याची रुंदीही आता २४ मी. इतकी वाढविण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल नारंगी रंगात दर्शविला आहे.

७. आ. क्र. १७ ते १९ च्या सामायिक हद्दीमधून जाणाऱ्या तसेच आ. क्र. १६ च्या पूर्व हद्दीने जाणाऱ्या दक्षिणोत्तर १५ मी. रुंद रस्त्याच्या आखणीत आता विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविल्यानुसार दुरुस्ती करण्यात येत आहे.

८. आ. क्र. १७– "दुकान केंद्र" या आरक्षणाचे स्थान बदलून ते आता पश्चिमेस १२ मी. व २४ मी. रुंदीचे रस्ते मिळतात त्या कोपऱ्यावर २४ मी. रस्त्याच्या दक्षिण बाजुने ठेवण्यांत येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र ०.२० हे. इतके भरेल.

९. वरील अनुक्रमांक ७ व ८ वरील बदलाच्या अनुषंगाने प्रारूप विकास योजनेतील आ. क्र. १७ तून मुक्त झालेले क्षेत्र तसेच त्यालगत पश्चिमेकडील ( १५ मी. रुंदीच्या रस्त्याची आखणी बदलल्यामुळे ) त्रिकोणाकृति क्षेत्र आता विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविल्यानुसार "सार्वजनिक-निमसार्वजनिक" क्षेत्रात सामील करण्यात येईल.

१०. आ. क्र. १९ – "दवाखाना व आ. क्र. २० प्रसुतिगृह, ही दोन्ही आरक्षणे एकत्रित करण्यात येऊन त्याचे नामकरण "दवाखाना व प्रसुतिगृह" असे ठेवण्यात येत आहे. सदर एकत्रित आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०.४८ हे. इतके भरेल. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

११. आ. क्र. २७– "दवाखाना" या आरक्षणाचे नामकरण आता "दवाखाना व प्रसुतिगृह" असे करण्यात येत असुन विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

१२. वरील बदलाच्या अनुषंगाने आ. क्र. २८– "प्रसुतिगृह" हे आरक्षण रद्द करण्यात येऊन त्याखालील जमीन निवासी विभागात समाविष्ट करण्यांत येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

१३. आ. क्र. २९– "दुकान केंद्र" हे आरक्षण वगळण्यात येत असून आरक्षणातुन मुक्त क्षेत्र विकास योजना नकाशावर नारंगी रंगात दर्शविल्यानुसार निवासी क्षेत्रात सामील करण्यात येत आहे.

१४. आ. क्र. ३७–"दुकान केंद्र" हे आरक्षण रद्द करण्यात येत असून ते आता आ. क्र. ३६– "सिव्हीक सेंटर" च्या दक्षिण–पश्चिम कोपऱ्यामध्ये नव्याने ठेवण्यात येत आहे. तसेच सदर आरक्षणाच्या नावामध्ये आता "दुकान केंद्र व भाजीबाजार" असा बदल करण्यात येत असून सदर बदल विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविला आहे. सदर बदलाचे अनुषंगाने आ. क्र. ३६– "सिव्हीक सेंटर" या आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ३.०३ हे. इतके राहील.

१५. वरील फेरबदलाच्याच अनुषंगाने आ. क्र. ३७–"दुकान केंद्र" या आरक्षणातून मुक्त झालेले क्षेत्रलगत आ. क्र. ३८– "प्राथमिक शाळा" या आरक्षणात सामील करण्यात येत असुन ह्या एकत्रित आरक्षणाचे हे नाव "प्राथमिक शाळा वा खेळाचे मैदान" असे बदलण्यात येत आहे. आ. क्र. ३८ –चे क्षेत्र आता ०.६० हे. इतके भरेल. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

१६. आ. क्र. ३९ –– "खुली जागा" या आरक्षणाचे नामकरण आता "बगीचा" असे करण्यात असुन सदर बदल विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

१७. आ. क्र. ४० – "दुकान केंद्र" या प्रारुप विकास योजनेतील आरक्षणामधुन सदर आरक्षणाच्या पुर्व भागातील विद्यमान "जनावरांचा दवाखाना व इलेक्ट्रीक हाऊस" या इमारती खालील जमीन वगळण्यात येत आहे. सदर आरक्षणाखाली आता ०.६० हे. इतके क्षेत्र राहील. सदर बदल विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

१८. (अ) आ. क्र. ४२ – "अग्नीशमन दल", (ब) आ. क्र. ४३ –– "टाऊन हॉल", (क) आ. क्र. ४४–आठवडे बाजार तथा "दुकान केंद्र" या आरक्षणाचा पुर्वेकडील (विद्यमान कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयाच्या इमारतीसह) तसेच

(ड) आ. क्र. ४५ –– "कत्तलखाना तथा मटन मार्केट" या आरक्षणाच्या दक्षिणेकडील भाग ह्या सर्व आरक्षणाखालील जमीनी त्या त्या आरक्षणातून मुक्त झालेले असे हे क्षेत्र कृषि उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान क्षेत्र असे संबोधण्यात येईल. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

सदर फेरबदलाच्या अनुषंगाने शिल्लक राहिलेल्या आ. क्र. ४४ "आठवडे बाजार तथा दुकान केंद्र" या आरक्षणाचे क्षेत्र आता १.१५ हे. इतके राहील.

१९. वरील फेरबदलाच्याच अनुषंगाने आ. क्र. ४५–"कत्तलखाना तथा मटन मार्केट" या आरक्षणातील शिल्लक क्षेत्र ही आरक्षणमुक्त करण्यात येऊन निवासी विभागात सामील करण्यात येत आहे. सदर फेरबदल विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

२०. आ. क्र. ५१–– "खुली जागा" या आरक्षणापैकी विद्यमान बगीचाच्या पूर्व हद्दीस लगत बहुतांशी क्षेत्र सदर आरक्षणातून मुक्त करण्यात येत असून ते निवासी विभागात सामील करण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

२१. विद्यमान बगीच्याच्या दक्षिण अंगास लागून असलेल्या आ. क्र. ५१ – "खुली जागा" या आरक्षणाच्या शिल्लक भागाचे नामकरण आता "बगीचा विस्तार" असे करण्यात येत आहे. विकास योजना नकाशावर सदर फेरबदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

२२. आ. क्र. ५२–– "खुली जागा व तालीम" या आरक्षणाचे नामकरण आता विकास योजना नकाशावर "नारंगी" रंगात दर्शविल्यानुसार "खेळाचे मैदान व तालिम" असे करण्यात येत आहे.

२३. आ. क्र. ५४ –– "प्रसुतिगृह" या आरक्षणाखालील क्षेत्र मुक्त करण्यात येऊन लगत आ. क्र. ५३ – "प्राथमिक शाळा" या आरक्षणात सामील करण्यांत येत आहे तसेच या आरक्षणाचे नामकरण आता "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" असे बदलण्यात येत आहे. दुरुस्त आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे ०.५४ हे. इतके भरेल. विकास योजना नकाशावर सदर बदल "नारंगी" रंगात दर्शविला आहे.

२४. कारंजा शहराला लागु करण्यात आलेल्या प्रमाणित बांधकाम उपविधी तथा निकास नियंत्रण नियमावलीतील परिशिष्ट "जी" मधील "जी–२ – निवासी विभाग आर–दोन" या शिर्षाखालील गांवठाण विभागात आर–दोन वापर अनुज्ञेय करण्यात यावयाच्या रस्त्याची किमात रुंदी ९ मी. ऐवजी ७.५ मी. अशी दुरुस्ती करण्यात येत आहे. सदर बदल विकास योजना अहवालात "नारंगी" रंगानें दर्शविला आहे.

टीप– मा. संचालक, नगर रचना यांनी मंजुरी दिल्याप्रमाणे उक्त विकास योजनेचा नकाशा कारंजा नगर परिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये जनतेच्या अवलोकनार्थ १ वर्षाच्या कालावधीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

प्र. त्र्यं. हर्डीकर,

पुणे :<br>
दिनांक २९ ऑक्टोबर १९८८.

संचालक, नगर रचना,<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे.

उपरोक्त गुराढोरांचे नियमन करण्याबाबत कोणास काही हरकती व सूचना सादर करावयाचे असल्यास त्यांनी ही अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत या कार्यालयास यांच्या हरकती अथवा सूचना सादर कराव्यात. उपरोक्त कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करून हयाबाबतीत अंतिम आदेश देण्यात येतील.

अ. अ. बोंडे,

यवतमाळ :<br>
दिनांक १८ जुलै १९९१.

जिल्हा उप-निबंधक,<br>
सहकारी संस्था, यवतमाळ.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२२

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

रजिस्टर्ड नं. एमजीपी-४

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
अकोला शाखा
आवक क्रमांक 3228
दिनांक 9/12/93

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

नं. ३८] गुरुवार, दिनांक १८ नोव्हेंबर १९९३/कार्तिक २७, शके १९१५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधीत असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा; अ. क्र. २२१

### BY DIRECTOR OF TOWN PLANNING

### *CORRIGENDUM*

No. DP-Karanja-(R)-TPV-6-9264.—

Director of Town Planning, Maharashtra State, Pune's Notification No. DP-Karanja-(R)-TPV-IV-7331-A, dated 29th October 1988 regarding sanction of the Revised Development Plan of Karanja under section 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 is published in the Maharashtra Government Gazette, Part I-A, Amravati Division Supplement, dated 31st October 1991 at pages 155 to 159. The sub-para (2) of paragraph 8 of this Notification is replaced by following words and figures:

*For*. "(b) Fixes the 31st January 1989 to be the date on which the Final Development Plan of Karanja (R) shall come into force." Read—"(b) Fixes the 1st January 1992 to be the date on which the Final Development Plan of Karanja (R) shall come into force."

G. L. MADAME,
Director of Town Planning,
Maharashtra State,
Pune.

Pune:
The 31st Dec. 1991.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २२२

### संचालक, नगर रचना, यांजकडून

### शुद्धीपत्रक

क्रमांक वियो–कारंजा (सु)-टीपीव्ही–६/९२६४.—

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये कारंजा शहराची सुधारित विकास योजना, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक वियो-कारंजा (सु)/टीपीव्ही–४/७३३१–अ, दिनांक २९ ऑक्टोबर १९८८ मंजूर केली आहे. ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग १–अ, अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक ३१ ऑक्टोबर १९९१ चे पृष्ठ १५५ ते १५९ वर प्रसिद्ध झाली आहे. या अधिसूचनेतील परिच्छेद ८ चे उपपरिच्छेद (२) खालीलप्रमाणे दुरुस्त करण्यात येत आहे.

"(ब) मंजुरी दिल्याप्रमाणे विकास योजना अंमलात येण्याची तारीख ३१ जानेवारी १९८९ निश्चित करीत आहेत." "च्या ऐवजी (ब) मंजूरी दिल्याप्रमाणे विकास योजना अंमलात येण्याची तारीख १ जानेवारी १९९२ निश्चित करीत आहेत. असे वाचावे."

गुणवंत मदामे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे:
दिनांक ३१ डिसेंबर १९९१.